जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune
Maharashtra – 411001
**E-Mail ID :** crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

**प्रेसनोट क्रमांक - ४७३ दिनांक - ०९/११/२०२४**

गुन्हे शाखा, युनिट-२ पुणे शहर

## सराईत रेकॉर्डवरील गुन्हेगाराकडून ०३ पिस्टल ०६ राऊंड असा एकूण ०१,२२,४१०/- रु.चा.मुद्देमाल जप्त

विधानसभा निवडणुकीचे अनुषंगाने मा.पोलीस आयुक्त पुणे शहर यांनी पुणे शहरात सराईत गुन्हेगारावर कायदेशीर कारवाई तसेच अग्निशस्त्रे बाळगणा-या इसमांना वेळोवेळी त्यास चेक करुन कायदेशीर कारवाई करणेचे आदेशीत करण्यात आले होते.

त्याअनुंषगाने पोलीस उप आयुक्त (गुन्हे) श्री. निखील पिंगळे यांचे मार्गदर्शनाखाली युनिट ०२ कडील पोलीस अधिकारी व पोलीस अमंलदार युनिट हद्दीत गस्त करीत असताना दि.०९/११/२०२४ रोजी पोलीस अंमलदार उज्वल मोकाशी, शंकर कुंभार यांना गुप्त बातमीदारामार्फत बातमी माहिती मिळाली की, गंगाधामकडे जाणा-या रोडवरती गुलटेकडी स्वारगेट पुणे येथे दोन इसम पिस्टल/अग्नीशस्त्र घेवून येणार आहेत अशी बातमी मिळाली.

सदर बातमी युनिट ०२ पोलीस निरीक्षक श्री प्रताप मानकर यांना दिली असता त्यांनी युनिट कडील पोलीस अधिकारी व पोलीस अमंलदार यांना कारवाई करणेकामी आदेशीत केले. त्याप्रमाणे युनिट ०२ कडील अधिकरी व अमंलदार यांनी कारवाई केली असता आरोपी नामे **१) अविनाश पोपट मोरे वय ३० वर्षे रा मेन बाजारपेठ शिरवळ पुणे २) क्षितिज भाऊसाहेब भोसले वय २० वर्ष रा.मु पो वॉटर कॉलनी ता खंडाळा जि सातारा** यांचेकडे ०३ लोखंडी पिस्टल मॅगझीनसह व ०६ जिवंत काडतुस असा १,२२,४१०/- रु.चा माल अनाधिकाराने बेकायदेशीर रित्या विनापरवाना जवळ बाळगून विक्रीकरीता पुण्यामध्ये घेवून आल्याबाबत कबुली दिली आहे त्यावरुन त्यांचेवर स्वारगेट पोलीस स्टेशन पुणे येथे गुन्हा रजि क्रमाक ४८१/२०२४ आर्म ॲक्ट कलम ३ (२५) व महाराष्ट्र पोलीस अधिनियम कलम ३७ (१) (३) सह १३५ प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला आहे.पुढील तपास सपोनि/आशिष कवठेकर, युनिट ०२, पुणे शहर हे करीत आहेत.

सदरची कामगिरी मा.अपर पोलीस आयुक्त, गुन्हे श्री शैलेश बलकवडे, पोलीस उप-आयुक्त,गुन्हे, श्री. निखील पिंगळे, सहा.पो.आयुक्त गुन्हे, श्री गणेश इंगळे, यांचे मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखा, युनिट-२,चे पोलीस निरीक्षक, श्री. प्रताप मानकर, सपोनि आशिष कवठेकर, अमोल रसाळ, पोउप-निरी. नितीन कांबळे, पोलीस अंमलदार उज्वल मोकाशी, शंकर कुंभार, संजय जाधव, शंकर नेवसे, अमोल सरडे, गणेश थोरात, ओमकार कुंभार, हनुंमत कांबळे, विनोद चव्हाण, विजयकुमार पवार, राहुल शिंदे, साधना ताम्हाणे, निखिल जाधव, पुष्पेंद्र चव्हाण, नागनाथ राख, यांनी केली आहे.




पोलीस आयुक्तालय पुणे शहर